अपना बँक
अपना सहकारी बँक लि.
APNA SAHAKARI BANK LTD.
आपली माणसं... आपली बँक®

# अपना सहकारी बँक लि.

मल्टी स्टेट शेड्युल्ड बँक

मल्टीस्टेट नोंदणी क्र.MSCS/CR/८१६/२०13 दि.२९ एप्रिल २०13.
नोंदणी क्रमांक :बी. ओ. एम. बी. एन. के. १०७ सन १९६८

**नोंदणी कार्यालय:** १०६ -ए, गोविंदजी केणी रोड, नायगांव, मुंबई: ४०० ०१४.
**कॉर्पोरेट ऑफिस:** अपना बँक भवन, डॉ. एस.एस.राव रोड, परळ, मुंबई: ४०० ०१२.
दूरध्वनी: २४१६४८६०/२४१०४८६१/२४१०४८६२/२४११४८६३ फॅक्स: २४१०४६८०
Email: corporateoffice@apnabank.co.in Website: www.apnabank.co.in

## : ५७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना :

(फक्त सभासदांकरीता)

अपना सहकारी बँक लि.च्या सर्व सभासदांना सूचना देण्यात येते की, बँकेची सत्तावन्नावी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता विसावा पार्क, मुंबई - गोवा हायवे, कल्लेगांव, पनवेल, जि.रायगड: ४१० २२१ येथे आयोजित करण्यात आली आहे.

: कामकाजाची विषय सूची :

१. दिनांक २६ सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या ५६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तांताचे वाचन करून कायम करणे.
२. अध्यक्षीय भाषण.
३. दिनांक ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या बँकेच्या ५७व्या वार्षिक अहवालातील वैधानिक लेखा परिक्षकांनी प्रमाणित केलेले नफा-तोटा पत्रक, ताळेबंद आणि संचालक मंडळाचा अहवाल स्वीकृत करणे.
४. सन २०२३-२४ च्या वैधानिक लेखा परिक्षकांच्या अहवालाचे वाचन करणे.
५. सन २०२२-२३ च्या वैधानिक लेखा परिक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालावर विचार करून स्वीकृत करणे.
६. रिझर्व्ह बँकेच्या मंजूरीस अधीन राहून, २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचे मानधन ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे.
७. Compromise & Settlement Policy अंतर्गत वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेल्या निर्लेखित कर्जास कार्योत्तर मान्यता देणे.
८. पोटनियम दुरुस्तीस मान्यता देणे. (रिझर्व्ह बँक व सेंट्रल रजिस्टार, नवी दिल्ली यांच्या मंजूरीस अधीन राहून)
९. वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या रजेला पोटनियम ८ (a) (ii) नुसार मान्यता देणे.
१०. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

**संचालक मंडळाच्या आदेशानुसार**
sd/-
**(सुरेश चव्हाण)**
**अंतरीम मुख्य कार्यकारी अधिकारी**

**मुंबई, १३ सप्टेंबर २०२४**

**सूचना :**

अ) गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास वरील सभा निश्चित केलेल्या जागीच सकाळी १०.३० वाजता घेण्यात येईल व पोटनियम क्र. २९ (iii) नुसार त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
ब) सभासदांना वार्षिक नफा-तोटा पत्रक, ताळेबंदाबाबत माहिती विचारावयाची असल्यास दि. १७/९/२०२४ पासून २१/९/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत कॉर्पोरेट ऑफिसशी संपर्क साधावा.
क) सन २०२३-२४ चा वार्षिक अहवाल सभासदांसाठी बँकेच्या वेबसाईटवर, नोंदणीकृत कार्यालय, कॉर्पोरेट ऑफिस व शाखांमध्ये दि. १७/९/२०२४ पासून उपलब्ध आहे.
ड) सर्व सभासदांस सूचित करण्यात येते की, त्यांच्या पत्त्यातील बदल किंवा नवीन पत्ता बँकेच्या शेअर विभागास कळविण्यात यावा.